आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

३ जून २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- विकसित शेतीशिवाय विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही, असं केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र राज्य सरकारकडून कोविड- १९ च्या व्यवस्थापनासाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी

- आसाममधे पूरस्थिती गंभीर, राज्यात २२ जिल्ह्यांमधल्या ५ लाखांपेक्षा जास्त नागरिकांना पुराचा फटका

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अंतिम सामना रंगणार

**<><><><>**

विकसित शेतीशिवाय विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही, असं केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. कृषिमंत्री आज पुणे दौऱ्यावर असून त्यांनी नारायणगांव इथल्या कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट दिली आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. देशभरातल्या १६ हजारांहून अधिक कृषिशास्त्रज्ञांना शेतकऱ्यांशी संवादाच्या माध्यमातून थेट जोडलं जाणार असून जोपर्यंत कृषी मंत्रालय आणि कृषी अधिकारी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत नाहीत तोपर्यंत आपण कृषिविकासाच्या दिशेनं ठोस पावलं उचलू शकणार नाही, असं ते म्हणाले. कृषिक्षेत्रात होणारं संशोधन शेतकऱ्यांच्या आवाक्यात असावं यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं. बनावट बियाणं आणि खतांची विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

याशिवाय शिवराजसिंह चौहान पुण्याच्या कृषी महाविद्यालयाला भेट देणार असून तिथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत सुरू असलेल्या कृषी हॅकेथॉन कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. चौहान यांच्या उपस्थितीत आज पुण्यातल्या बालेवाडी क्रीडा संकुलात प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा मेळावा तसंच महाआवास अभियानाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळाही होणार आहे.

**<><><><>**

भारतातील सौरऊर्जा साठवण ही बहुसंख्य राज्यातल्या औद्योगिक ऊर्जेपेक्षा स्वस्त आहे, असं केंद्रीय नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. भारताच्या औद्योगिक विकासाला कलाटणी देणारी ही गोष्ट असल्याचं जोशी म्हणाले. देशात ६ रुपये प्रति किलोवॅट दरानं वीज पुरवठा केला जाऊ शकतो. हे दर कोळशांवर चालणाऱ्या प्रकल्पांपेक्षा कमी आहेत, असं कॅलिफोर्निया विद्यापीठाने केलेल्या अभ्यासात समोर आलं आहे.

**<><><>**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी बहुपक्षीय शिष्टमंडळं जगभरातल्या विविध देशांना भेट देत आहेत. त्या देशांचे उच्चपदस्थ अधिकारी, प्रभावशाली व्यक्ती, माध्यम प्रतिनिधी आणि तिथल्या भारतीय समुदायाशी ते संवाद साधत आहेत. भाजपा खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ अल्जेरिया, सौदी अरेबिया, कुवेत आणि बाहरीन इथं भेट देऊन आज सकाळी मायदेशी परतलं.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं कैरोमध्ये इजिप्तच्या परराष्ट्र व्यवहार परिषदेची भेट घेतली. लायबेरियामध्ये, शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं राष्ट्राध्यक्ष जोसेफ न्युमा बोआकाई आणि लायबेरियाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री सारा बेयसोलो न्यांती यांची भेट घेतली.

द्रमुक खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ रशिया, लाटविया, स्लोव्हेनिया, ग्रीस आणि स्पेनचा दौरा करून आज परत येईल. काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाने ब्राझीलमधले उच्चपदस्थ नेते आणि अधिकाऱ्यांची भेट घेतली. दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यासाठी हे शिष्टमंडळ अमेरिकेला रवाना होईल.

या शिष्टमंडळांनी विविध देशांच्या भेटीदरम्यान, सर्वप्रकारच्या दहशतवादाविरोधात भारताचा शून्य सहनशीलतेचा ठाम संदेश दिला.

**<><><>**

महाराष्ट्र सरकारनं कोविड- १९ च्या व्यवस्थापनासाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सर्व आरोग्य सुविधांनी इन्फ्लूएंझा-सदृश आजार आणि श्वसनाची गंभीर समस्या असलेल्या ५ टक्के रुग्णांची तपासणी करावी, असे निर्देश दिले आहेत. आरोग्य विभागानं सर्व महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि जिल्हा प्रशासनांना हे निर्देश दिले आहेत. हातांची स्वच्छता, श्वसन संस्थेचं आरोग्य, खोकताना आणि शिंकताना तोंड आणि नाक झाकणं तसंच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचं वर्तन याबाबत

जनजागृती करणारे उपक्रम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, राज्यात सध्या कोविडचे ५०६ रुग्ण उपचार घेत आहेत.

**<><><><>**

भारत सर्वसामावेशक, शाश्वत आणि भविष्यासाठी सज्ज डिजिटल विकासाकरता वचनबद्ध असल्याचं केंद्रीय दूरसंवाद राज्यमंत्री चंद्रशेखर पेम्मासनी यांनी म्हटलं आहे. ब्राझील इथं झालेल्या ब्रिक्स देशांच्या अकराव्या दूरसंवाद मंत्रीस्तरीय परिषदेत ते काल बोलत होते. भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचं सर्वसमावेशक आणि परिवर्तनकारी डिजिटल सुशासनाकरता एक जागतिक मापदंड म्हणून सादरीकरण त्यांनी यावेळी केलं. भारतात प्रगत संपर्कव्यवस्था उभारण्यात आधार आणि युपीआयच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची माहिती त्यांनी दिली.

**<><><><>**

द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया - आय सी ए आयनं सप्टेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या सनदी लेखापाल - सीए परीक्षांचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. या परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पाच जुलैपासून सुरू होणार आहे. ही परीक्षा तीन ते बावीस सप्टेंबर दरम्यान होणार असल्याचं ICAI ने सांगितलं आहे.

**<><><><>**

आसाममधल्या पूरस्थितीनं आणखी गंभीर रूप घेतलं असून, राज्याच्या २२ जिल्ह्यांमधल्या ५ लाखापेक्षा जास्त नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. पुरामुळे होजई इथं एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून, दिब्रुगड मध्ये दोन जण, तर हैलाकांडी इथं दोन जण बेपत्ता आहेत. राज्याच्या ६५ महसूल मंडळांमधली १ हजार २५० पेक्षा जास्त गावं पुरामुळे बाधित झाली असून, १२ हजार ६०० हेक्टरपेक्षा जास्त शेत जमिनीचं नुकसान झालं आहे.

ब्रह्मपुत्रा, बराक आणि या नद्यांच्या सर्व उपनद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याचं राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं म्हटलं आहे. पूरग्रस्त नागरिकांसाठी राज्य सरकारनं १६५ मदत छावण्या आणि १५७ मदत केंद्र उघडली आहेत. पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि राज्यातल्या पूरस्थितीचा आढावा घेतला. पूरग्रस्त भागात मदत आणि पुनर्वसनाच्या प्रयत्नांना केंद्र सरकारचं पूर्ण सहकार्य लाभेल असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. दरम्यान, आसामच्या काही भागात आज हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><>**

सिक्कीममधल्या लांगचू इथं भूस्खलन झालं असून, या ठिकाणी अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांच्या सुटकेचे प्रयत्न सुरु आहेत त्यांचा पुढचा प्रवास सुरु आहे. राज्य आपत्कालीन प्रतिसाद केंद्रानं ही माहिती दिली.

या प्रवाशांच्या सुटकेसाठी केंद्रानं सिक्किममधल्या महाराष्ट्र सदन निवासी आयुक्तांमार्फत स्थानिक प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधला होता.

**<><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना होणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. २००८ पासून सुरू झालेल्या आयपीएल स्पर्धेत आजतागायत या दोन्ही संघांकडे विजेतेपद आलेलं नाही. त्यामुळे दोन्ही संघांसाठी आजचा सामना महत्त्वाचा आहे.

**<><><>**

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीत भारताच्या पी व्ही सिंधूनं जपानच्या नोझोनी ओकुहराला नमवून द्वितीय फेरीत प्रवेश केला आहे. सिंधूनं ओकुहराचा२२-२०, २१-२३, २१-१५ असा पराभव केला. पुरुष एकेरीत मात्र चीनच्या शी यु की कडून पराभूत झाल्यानं भारताच्या लक्ष्य सेनचं आव्हान संपुष्टात आलं. या स्पर्धेत आज पुरुष एकेरीत एच एस प्रणॉय तर पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचे सामने होणार आहेत.

**<><><>**

नीरज चोप्रा क्लासिक २०२५ भालाफेक स्पर्धा येत्या गुरुवारपासून बंगळुरूमधल्या श्री कांतीरवा स्टेडिअमवर सुरु होणार आहे. यापूर्वी ही स्पर्धा २४ मेपासून सुरु होणार होती. मात्र, ओपरेशन सिंदूर आणि देशाचे ऐक्य प्रदर्शित करण्यासाठी हे आयोजन पुढं ढकलण्यात आलं होतं. ही भारतानं आयोजित केलेली पहिलीच आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धा असून या स्पर्धेचं नेतृत्व ऑलम्पिक विजेता नीरज चोप्रा करणार आहे. या स्पर्धेत नीरज चोप्रासह थॉमस रोहलर, एंडरसन पीटर्स आणि इतर अनेक ऑलिम्पिक पदक विजेते सहभागी होणार आहेत.

**<><><>**

इटली मधल्या माउंट एटना या ज्वालामुखीचा काल उद्रेक झाला. त्यामुळे या ठिकाणी भेट देण्यासाठी आलेल्या पर्यटकांमध्ये घबराट पसरली. उद्रेकामुळे उत्सर्जित होणाऱ्या लाव्हारसाच्या प्रवाहानं नैसर्गिक धोक्याची पातळी ओलांडली नसून, त्यामुळे नागरिकांना कोणताही धोका नसल्याचं सिसिलीचे राष्ट्राध्यक्ष रेनाटो शिफानी यांनी म्हटलं आहे.

ज्वालामुखीचा उद्रेक स्ट्रॉम्बोलियन स्फोटांमुळे झाला असून तो वाढत्या तीव्रतेच्या उद्रेकाचा एक प्रकार असल्याचं इटलीच्या राष्ट्रीय भूभौतिकशास्त्र आणि ज्वालामुखीशास्त्र संस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><>**

व्हिएतनाममध्ये भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष महिनाभर ठेवल्यानंतर आज भारतात परत आणण्यात आले. व्हिएतनाममधलं प्रदर्शन २१ मे रोजी संपणार होतं, मात्र, व्हिएतनाम सरकारच्या विनंतीवरून भारतानं हे प्रदर्शन दोन जूनपर्यंत ठेवले. या दौऱ्यात भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष नऊ शहरांमध्ये दर्शनासाठी ठेवण्यात आले होते, ज्याला एक कोटींहून अधिक भाविकांनी भेट दिली.

**//<><><><>//**